पाटोदा
# संचार
PATODA SANCHAR

E-mail-pat.sanchar@gmail.com संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे संपादक-विलास डोळसे

❑पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३४ वे, वर्ष १९ वे ❑ अंक १०० वा ❑ मंगळवार दि.२१ मे २०२४ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एलएल/७६.बीड/२०२२-२४ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

❑ PATODA/BEED ❑ YEAR 19 th ❑ Issu -100 ❑ Tuesday 21 May 2024 ❑ Page- 4 Price- Rs.1. ❑Post.Reg.No.L/76/Beed/2022-24 ❑R.N.I. No.MAHMAR/46359

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

## दुपारी १ वाजता लागणार बारावीचा निकाल

पुणे । महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाच्या अर्थात बारावी बोर्डाच्या परीक्षेच्या निकालाची तारीख जाहीर करण्यात आली आहे. मंगळवारी २१ मे रोजी दुपारी एक वाजता बारावीचा निकाल जाहीर केला जाईल, अशी घोषणा महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाकडून करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून बारावीचे विद्यार्थी आणि पालकांना निकालाची उत्सुकता लागली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात परीक्षा घेण्यात आली होती. बारावीच्या परीक्षेसाठी १५ लाख १३ हजार ९०९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. बारावीची परीक्षा नऊ विभागीय मंडळांतर्फे आयोजित करण्यात आली होती.

# ‘बोगस वोटिंग प्रकरणात कठोर कारवाई करा’ बीडच्या प्रकरणात शरद पवारांनी घातलं लक्ष

**बीड । प्रतिनिधी**


राज्यात लोकसभा निवडणुकीचे चार टप्प्यातील मतदान पार पडले आहे. आज पाचव्या टप्प्यांचे मतदान पडत आहे. या वेळी पैसे वाटल्याचे आणि मतदारांवर दबाव आणण्यात आल्याच्या अनेक घटना समोर आल्या होत्या. बीड आणि बारामतीतील मतदानात पैशांचा गैरवापर आणि काही व्यक्तीकडून नागरिकांवर दबाव झाल्याचा आरोप रोहित पवारांनी केला होता. यामळे राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. आता राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवारांनी बीड आणि बारामतीत बोगस झाल्याचा आरोप केला आहे. तसेच या संदर्भात निवडणूक आयोगाकडे कडक कारवाई करण्याची मागणी देखील त्यांनी या वेळी केली आहे.

शरद पवार म्हणाले, बीड, पुणे, बारामती लोकसभा मतदारसंघ सोडले तर बाकी ठिकाणी मतदान शांततेत पार पडलं. महाराष्ट्रात कधीच पैशाचा वापर झाला नव्हता. यावर्षी मोठया प्रमाणात पैशांचा वापर झाला. बारामती लोकसभा रात्री दोन वाजता एक बँक उघडी होती. आणि तिथून पैसे वाटप होत होते. हा प्रकार घडला आहे. असं कधी झालं नाही पण यावर्षी काही ठिकाणी अशा गोष्टी पाहिल्या मिळाल्या. बीड आणि बारामती मध्ये बोगस मतदान झालं आहे. बीडमध्ये बूथ कॅप्चर करण्याचा प्रकार झाला. बोगस मतदान करणे, लोकांना मतदान करू देणे हे देखील प्रकार घडले. पुणे जिल्ह्यात देखील असे प्रकार पाहायला मिळेल. यामागे जो आहे त्याच्यावर सक्त कारवाई केली पाहिजे हा माझा आग्रह आहे.

**बजरंग सोनवणे यांची निवडणूक आयोगाकडे तक्रार**

शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी मागच्या आठवड्यात या प्रकरणी निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. त्यांनी पत्रात म्हटलं की, परळी मतदार संघातील इंजेगांव, सारडगांव, धर्मापुरी, डिग्रस, नाथ्रा, कीडगांव साबळा, जिरेवाडी, बालेवाडी व कन्हेरवाडी या गावातील मतदान केंद्रावर व मतदान केंद्र क्रमांक १८८, १८९, १३२ व १६१ आणि केज तालुक्यातील देवगाव, लाडेवडगाव, माजलगांवमधील गोविंदवाडी व धारुर मधिल सोनिमोहा, पिंपरवडा, मंदवाडी व चाडगांव आष्टीमधील वाली आणि पाटोदा मधील वाघीरा हे सर्व मतदान केंद्र ताब्यात घेवून बोगस मतदान केलेले आहे

### निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे सध्या आमची अडचण होत आहे- शरद पवार



निवडणूक आयोगाच्या सध्या भूमिकेवर देखील शरद पवारांनी वक्तव्य केले आहे . शरद पवार म्हणाले, निवडणूक सध्या असे काही निर्णय घेत आहेत की त्यामुळे अडचण होत आहे. आमचा पक्ष काढून घेतला आमचे चिन्ह काढून घेतला आणि त्यामुळे आम्हाला कोर्टात जावं लागलं. मात्र आम्ही यंदाच्या निवडणुकीत आम्ही सामंजस्याची भूमिका घेत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. आम्ही स्वतः ४८ पैकी दहा जागा लढवत आहोत आमच्या या भूमिकेमुळे आम्हाला होताना पाहायला मिळतोय.

## परळीत उष्माघाताचा पहिला बळी, भाजीपाला विक्रेत्याचा मृत्यू

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून उन्हाच्या तीव्रतेने जीवाची लाही लाही होत आहे. वाढलेले तापमान लक्षात घेता उष्माघातापासून बचाव करण्यासाठी जागृती करण्यात येत आहे. मात्र हातावर पोट असणाऱ्या लोकांना उन्हात काम करण्याशिवाय नाही. यातूनच परळीच्या आठवडी बाजारातील एका भाजीविक्रेत्यावर काळाने घाला घातला असून उष्माघाताने त्याचा बळी गेला आहे. महादेव संभाजी गुट्टे (वय ५४) असे या भाजीविक्रेत्याचे नाव आहे.



परळी तालुक्यातील दैठणा घाट येथील महादेव गुट्टे हे आपल्या शेतात उत्पादित करून आठवडी बाजारात भाजीपाल्याची विक्री विकतात. आठवडी बाजारात नेहमीप्रमाणे दुपारी भाजीपाल्याची विक्री करत असताना उष्माघाताने भोवळ आली. व ते जागेवरच कोसळले. भाजीपाला विक्रेत्यांनी त्यांना तातडीने परळी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारापुर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. परळी तालुक्यातील उष्माघाताचा हा पहिला बळी ठरला आहे. दरम्यान, महादेव यांच्या संपूर्ण कुटुंबाची उदरनिर्वाहाची जबाबदारी त्यांच्यावर होती. त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण कुटुंब उघड्यावर पडले आहे.

## अरविंद केजरीवालांच्या अडचणीत वाढ; ‘या’ ३ देशांकडून ‘आप’ला निधी मिळाल्याचा ‘ईडी’च्या तपास अवहालात खुलासा

नवी दिल्ली । वृत्तसेवा

दिल्लीतील मद्य धोरण असो वा स्वाती मालिवाल प्रकरण असो आम आदमी पक्षाच्या अडचणी कमी होताना दिसत नाहीत. या पक्षाला परदेशातून मिळालेल्या निधीच्या संदर्भातही ईडीने आपल्या तपास अहवालातून मोठा खुलासा केला आहे.

आपला परदेशातून मिळालेल्या देणग्यांच्या संदर्भातील आपला संपूर्ण अहवाल ईडीने आता केंद्रीय गृहमंत्रालयाकडे सोपवला आहे. या अहवालानुसार आपला २०१४ ते २०२२ या काळात परदेशातून ७.०८ कोटी निधी



मिळाला आहे. एका संकेतस्थळावर याबाबतचे सविस्तर वृत्त देण्यात आले आहे.

या बातमीनुसार ईडीने आम आदमी पक्षावर एफसीआरए, आरपीए आणि आयपीसीच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे आपला कोणी निधी दिला त्यांची ओळख आणि त्यांचा देश यासंदर्भातील दस्तावेजही ईडीने आपल्या अहवालात जोडले आहेत.हा सर्व प्रकार म्हणजे आम आदमी पार्टीवर आता संकटांचा पहाड कोसळणार असल्याचे संकेत असल्याचे मानले जाते आहे.

अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझिलंड, सौदी अरब, संयुक्त अरब अमिरात, कुवेत, ओमान आणि अन्य काही देशांतील दात्यांकडून आम आदमी

पान दोन वर

## जिल्ह्यातील १४३ धरणांमध्ये केवळ ४ टक्केच पाणीसाठा शिल्लक; माजलगाव धरणासह ५४ प्रकल्प मृतसाठ्यात

**बीड । प्रतिनिधी**

एप्रिल व मे महिन्यात पडलेल्या तीव्र उन्हामुळे जिल्ह्यातील जवळपास सर्वच धरणांनी तळ गाठला आहे. १४३ धरणांमध्ये केवळ ४ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे. माजलगाव धरणासह ५४ प्रकल्प मृतसाठ्यात गेले असल्याने पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे.

**जून महिन्यात वेळेवर पाऊस येणे आवश्यक**

जिल्ह्यात गतवर्षी झालेल्या अपुऱ्या पावसाचा परिणाम आता समोर येत आहे. शहरासह ग्रामीण भागात पाणीटंचाईचा सामना सुरु आहे. पाणीपातळी खालावल्याने अनेक गाव-वाड्या, तांड्यांवर तीव्र पाणीटंचाई आहे. जिल्हा प्रशासनाच्या १० मे रोजीच्या अहवालानुसार जिल्ह्यात ३८२ टँकरच्या माध्यमातून ६ लाख ४३ हजार १०२ लोकांना पाणीपुरवठा केला जात आहे. दरम्यान, मागच्या वर्षी पाऊस परंतु धरणक्षेत्र परिसरात झाला नाही. धरणात पाणीसाठा झाला तर आसपासच्या गावांतील जमिनीतील पाणीपातळी वाढलेली राहते. धरणांमध्ये पाणीसाठा झाला नसल्याने धरण परिसरातील



पाणीपातळीसुद्धा खालावली आहे. आता ज्या ठिकाणी जलस्रोत शिल्लक आहे त्याच ठिकाणावरून पाणीउपसा केला जात आहे. सद्यस्थितीला जवळपास सर्व धरणांमधील पाणीसाठा संपत आला आहे. ही बीड जिल्हावासीयांसाठी चिंताजनक बाब

**हवामान विभागाच्या अंदाजामुळे दिलासा**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार ३१ मे रोजी केरळमध्ये मान्सून दाखल होणार आहे. त्यानंतर ७ जून पूर्वीपासूनच पावसाला सुरुवात होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सध्या मान्सूनसाठी पोषक वातावरण तयार झाले आले. तसेच बंगालच्या उपसागरामध्ये कमी दाबाचा पट्टा तयार होत असल्याचे हवामानतज्ज्ञ सांगत आहे. हवामान विभागाच्या अंदाजामुळे दिलासा मिळाला आहे.

**उपयुक्त पाणीसाठा ४.७२ टक्केच**

धरणे मृतसाठ्यात असली तरी त्यातील थोडाफार पाणीउपसा केला जाऊ शकतो. जिल्ह्यातील सर्व धरणांमध्ये आज रोजी ४.७२ ऐवढा उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. त्यातील १०.६०६ एवढा दलघमी प्रत्यक्ष पाणीसाठा आहे. त्यातून काही दिवस बीडकरांची तहान भागवली जाऊ शकते.

पावसाळा सुरू होणार असल्याने पुढील काळात गंभीर परिस्थिती निर्माण होणार नाही असा विश्वास अनेकांना आहे. मे अखेरपासून वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात होत असल्याचे अनुभव अनेकांना आहे. त्यामुळे उन्हाची तीव्रता देखील कमी होईल व पाण्याची चिंता मिटेल, असा आशावाद व्यक्त होत आहे.

**५२ प्रकल्प पडले कोरडे**

बीड जिल्ह्यातील १४३ पैकी ५२ प्रकल्प कोरडे पडले आहेत ५४ पाणी प्रकल्प जोत्याखाली आहे. तसेच २७ प्रकल्पामध्ये २५ टक्के, ७ प्रकल्पामध्ये २५ ते ५० टक्के तर ३ प्रकल्पामध्ये ५० ते ७५ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. कोरड्या पडलेल्या पाणी प्रकल्पातून पाणी काढता येणे शक्य नाही मात्र जी प्रकल्प जोत्याखाली आहेत, त्यातून थोडाफार पाण्याचा उपसा केला शकतो.

## १९ गावात फेरमतदान घेण्याची बजरंग सोनवणे यांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीडमध्ये बोगस मतदान केल्याचा आरोप शरद पवार यांनी केला होता. या आरोपानंतर बजरंग सोनवणे यांनी ईव्हीएम मशीन ठेवलल्या स्ट्राँग रुमला भेट दिली. तर बीड लोकसभेसाठी बोगस मतदान झाल्याची तक्रार बजरंग सोनवणे यांनी याआधीच केली आहे. मात्र मागच्या दोन-तीन दिवसांमध्ये काही व्हिडिओ समोर आल्यानंतर सोनवणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस युवक अध्यक्ष महबूब शेख यांच्यासह बीड शहराच्या शेजारी असलेल्या पॉलिटेक्निक कॉलेजमधील स्ट्राँग रूमला भेट दिली.

या भेटीनंतर सोनवणे यांनी बीडचे पोलिस आणि महसूल प्रशासनावर आरोप केले. या



निवडणुकीत प्रशासनाने एकतर्फी काम केल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. तर परळी विधानसभा मतदारसंघांत अनेक ठिकाणी बोगस मतदान झाल्याच्या तक्रारी एसपी आणि कलेक्टर यांच्याकडे दिल्या. मात्र त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. तसेच बीडमधील परळीत बुथ कॅप्चर करण्यात आले, अनेक पोलिंग एजंन्टसला गायब केलं. मतदारांना मारहाण करण्यात आली असे अनेक आरोप करत सोनवणे यांनी मतदारसंघातील जवळपास १९ गावात फेरमतदान घेण्याची मोठी मागणी केली. त्यामुळे आता या मागणीवर निवडणूक आयोग काय भूमिका घेणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

पान दोन वर

## लोकसभा निवडणूक : पाचव्या टप्प्यात सरासरी ५६.६८ टक्के मतदान

नवी दिल्ली । वृत्तसेवा

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात ८ राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील ४९ मतदारसंघांमध्ये सोमवारी (दि.२०) सरासरी ५६.६८ टक्के मतदान झाले.



निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सर्वात जास्त मतदान पश्चिम बंगालमध्ये ७३ टक्के तर सर्वात कमी ४८.६६ टक्के मतदानाची नोंद महाराष्ट्रात झाली. पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात त्रिपुरामध्ये सर्वाधिक तर तिसऱ्या टप्प्यात आसाममध्ये सर्वाधिक मतदान झाले होते. त्यानंतर चौथ्या आणि पाचव्या टप्प्यातही पश्चिम बंगालने सर्वाधिक मतदान होण्याची आघाडी कायम राखली आहे.

देशात १८ व्या लोकसभेसाठी ४९ मतदारसंघांमध्ये मतदानाचा पाचवा टप्पा सोमवारी (दि.२०) पार पडला. महाराष्ट्रातील १३ लोकसभा मतदारसंघांत मतदान पार पडले. त्यामध्ये मुंबई उत्तर, मुंबई उत्तर-पश्चिम, मुंबई उत्तर-पूर्व, मुंबई उत्तर-मध्य, मुंबई दक्षिण-मध्य, मुंबई दक्षिण, ठाणे, कल्याण, पालघर, धुळे, दिंडोरी, नाशिक, भिवंडी या मतदारसंघांचा समावेश आहे. देशभरात उत्तर प्रदेश १४, बिहार ५, पश्चिम बंगाल ७, झारखंड ३, ओडिशा ५, जम्मू आणि काश्मीर १, लडाख १ अशा एकूण ४९ जागांसाठी मतदान झाले.

निवडणूक आयोगाने सोमवारी संध्याकाळी पाच वाजेपर्यंतची मतदानाची टक्केवारी जाहीर केली. मात्र, या टक्केवारीत बदल होऊ शकतो, असेही आयोगाच्या वतीने सांगण्यात आले. काही ठिकाणी उशिरापर्यंत मतदान सुरू होते. त्या सगळ्यांची एकूण स्पष्ट माहिती येण्यास उशीर होऊ शकतो, असेही आयोगाने स्पष्ट केले.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, संध्याकाळी पाच वाजेपर्यंत विविध राज्यांमध्ये पार पडलेल्या मतदानाची टक्केवारी,

महाराष्ट्र - ४८.६६ %
उत्तर प्रदेश- ५५.८० %
बिहार - ५२.३५ %
पश्चिम बंगाल - ७३.०० %
झारखंड - ६१.९० %
ओडिशा - ६०.५५ %
जम्मू आणि काश्मीर - ५४.२१ %
लडाख - ६७.१५ %

## माढ्यात कोण बाजी मारणार? चक्क ११ बुलेट गाड्या ते थार मोटारीपर्यंत पैज..




सोलापूर । प्रतिनिधी

भाजपची प्रतिष्ठा पणाला लागलेल्या आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या कुटुंबीयांच्या अस्तित्वाची मानली गेलेल्या माढा लोकसभा मतदारसंघात बाजी कोण मारणार, याची सार्वत्रिक उत्सुकता वाढली आहे. दोन्ही पक्षांकडून विजयाचे दावे होत असताना दुसरीकडे विजयाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, यावर मोठ्या प्रमाणावर पैजाही लागल्या आहेत. काहीजणांनी चक्क मेंढ्याची पैज लावली आहे. काहीजणांनी तब्बल ११ बुलेट गाड्यांची तर काहीजणांनी थेट थर मोटारीपर्यंत लावलेली पैज हा चर्चेचा विषय झाला आहे.

माढा तालुक्यातील योगेश पाटील आणि नीलेश पाटील या भावंडांनी माढ्यातून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार धैर्यशील मोहिते-पाटील यांची ‘तुतारी’ जोरात वाजणार म्हणून चक्क ११ नव्या बुलेट गाड्यांची पैज जाहीर करून भाजप समर्थकांना आव्हान दिले आहे. मात्र हे आव्हान भाजपचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या कोणीही समर्थकांनी अद्यापि स्वीकारले नाही. योगेश पाटील आणि नीलेश पाटील हे भावंड धैर्यशील मोहिते-पाटील यांचे

पान दोन वर

संचार

# सुरक्षा ठेव, इंधन अधिभार वाढीतून छुपी वीज दरवाढ

गेल्या महिन्यातच वीजदर वाढ लागू केल्यानंतर पुन्हा अतिरिक्त सुरक्षा ठेव मागणी आणि वाढीव इंधन अधिभार लागू करण्यात आल्याने वीज ग्राहकांना दुहेरी धक्का विज वितरण कंपनीने दिला आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयेगाच्या बहुवार्षिक वीज दर वाढ मंजुरीनुसार १ एप्रिल २४ पासून सरासरी ७ ते ८ टक्के वीजदर वाढ लादली गेली आहे. या वाढीव दराच्या बिलासोबतच महावितरणने अतिरिक्त सुरक्षा ठेव मागणी व वाढीव इंधन अधिभाराच्या रुपाने आणखी एक अतिरिक्त धक्का वीज ग्राहकांना दिला आहे.

पूर्वी वीज ग्राहकांच्या सरासरी वीज वापराच्या एक महिन्याएवढी सुरक्षा ठेव ठेवणे बंधनकारक होते. पण सन २०२२ पासून नियामक आयोगाने सदर सुरक्षा ठेव दोन महिन्याच्या बिलाएवढी घेण्यास महावितरणला मंजुरी दिली. त्यानुसार मार्च अखेरीस प्रत्येक वीज ग्राहकाच्या वार्षिक वीज वापराचे अवलोकन करुन वाढीव वापरानुसार, कमी पडणारी रक्कम अतिरिक्त सुरक्षा ठेव म्हणून स्वतंत्र बिलाद्वारे प्रत्येक एप्रिलनंतर मागणी केली जाते. वास्तविक राज्यातील सामान्य वीज ग्राहकांचा विचार करता ९९ टक्के वीज ग्राहक वेळेवर बिल भरणा करीत असताना केवळ १ टक्के अप्रामाणिक व वेळेवर बिल न भरणार्या ग्राहकांसाठी ९९ टक्के ग्राहकांना दोन महिन्याएवढ्या सुरक्षा ठेवीसाठी वेठीस धरले जात असून हे अन्यायी असूनही आयोगाच्या मंजुरीमुळे महावितरणला ही अन्यायी वसुली करण्याचा परवानाच मिळाला आहे..

एप्रिलच्या बिलामध्ये १५ पैशापासून एक रुपयापर्यंत वाढीव इंधन अधिभाराची आकारणी करुन महावितरणने आणखी एक छुपी दरवाढ लादून वीज ग्राहकांना वेठीस धरले आहे. उघडपणे सात ते आठ टक्के प्रतियुनिट वीजदरवाढ मंजूर असताना सुरक्षा ठेव आणि वाढीव इंधन अधिभार यामुळे प्रत्यक्षात दरवाढ १५ टक्क्यांवर पोहोचली आहे.

बिल वसुली सुलभ करण्यासाठी व थकबाकी रोखण्यासाठी महावितरणला प्रिपेड मिटर्स बसविण्यास आयोगाने मंजुरी दिली असून यासाठीची निविदा प्रसिद्ध करुन सुमारे सव्वादोन कोटी स्मार्ट मीटर्स बसवीण्याचे नियोजन पण सुरु केले आहे. प्रिपेड मीटर्स बसविले की सुरक्षा ठेव मागण्याचा प्रश्नच येत नाही. प्रिपेड मीटर बसविल्यानंतर सुरक्षा ठेवीची मागणी कशासाठी असा सवाल उपस्थित होत आहे.

# 'डे झिरो च्या उंबरठ्यावरचा पावसाळा'!

**'नेमेची येतो पावसाळा या तो आला पण एक इशारा त्यासोबत आहे. तो जाणला तर आपण या पावसाळ्या पाठोपाठ दुष्काळांचं दुष्टचक्र थांबू शकणार नाही बंगळूरुनं दिलाय इशारा त्याकडे लक्ष देत गांभीर्यांनं पावसाचं स्वागत करताना पाणी जपलं नाही तर 'डे झिरो' येऊ घातला. पाणी –बाणी बाबत खास लेख.**



आपल्या मराठी भाषेत खास काही गुण आहेत आणि भाषेची काही वैशिष्ट्ये देखील आहेत, अलंकार, वृत्त आणि इतर विविध प्रकारांनी समृद्ध अशा या आपल्या मराठी भाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणून भाषक म्हणींचा उल्लेख करता येईल. तसे म्हणींचा हा प्रकार सर्वच भाषांमध्ये असला तरी मराठीत याचे महत्त्व वेगळे आहे.

अतिशय चपखलपणे शब्दात मार्मिक पद्धतीने आपल्याकडे म्हणी आढळतात अर्थात हा भाषिक प्रवास करण्याचा भाग वेगळ्याच कारणाने आहे.

आपल्याकडे आनंदवार्ता आली.. मान्सून अर्थात नैऋत्य मौसमी पाऊस नियमित आराखडा बाजूला ठेवत ३ दिवस आधी अंदमानात दाखल झालाय मात्र आपल्याकडे अशा पल्लवीत होत असताना देखील तहान भागत नाही कारण अर्थातच पाणी.

पाणीबाणी, पाण्याचे संकट, दुर्भिक्ष्य पासून दुष्काळापर्यंत शब्द माध्यमातून उमटतात आणि पाण्याचं संकट अधिक गहिरं होतं आहे असं जाणवायला लागतं.

आपल्या खंडप्राय भारत देशात एकाचवेळी काही ठिकाणी दुष्काळ तर काही ठिकाणी अतिवृष्टी असं विषम चित्र आहे आणि याचं कारण देखील तसंच आहे. कारण आपला देश हा मौसमी हवामान क्षेत्रात आहे. आसेतू हिमाचल विस्तीर्ण देशात ही स्थिती आपरिहार्य आहे असेच म्हणता येईल. मात्र वारंवार काही भागात निर्माण होणारी पाण्याची टंचाई आणि त्याच्याशी निगडित बाबी आपल्या नियोजनाशी जोडलेल्या आहेत.

गेल्या काही वर्षात झपाट्याने झालेले नागरिकीकरण आणि शहरांचा विस्तार व सोबतच झपाट्याने वाढणारी लोकसंख्या यांचा या पाणी प्रश्नाशी जवळचा संबंध आहे.

वाढत्या शहरीकरणामुळे प्रश्न गंभीर होत आहे आणि त्यातही पिण्याचे पाणी अर्थात पेयजलाची समस्या अत्यंत गंभीर आहे आणि याची पहिली धोक्याची घंटा ८ वर्षांपूर्वीच आपण दक्षिण आफ्रिकेत ऐकलेली आहे. या ठिकाणी पाणी समस्या गंभीर होत पेयजल शून्य स्थिती २०१७ साली आली ज्याला आपण 'डे झिरो' म्हणून नाव दिलं.

पेयजल उपलब्धता आणि लोकसंख्या सांगड योग्यरित्या बसवता आली त्यामुळे केप टाऊन मध्ये 'डे झिरो' आल्यानंतरही आपण त्यापासून काही धडा घेतला नाही असेच म्हणावे लागेल. कारण ३ महिन्यापूर्वी बंगळूरु शहरात थोड्याफार फरकाने 'डे झिरो'ची स्थिती आली होती.

बंगळूरुने गेल्या वर्षभराच्या कालावधीत शहरात पाण्याने तुंबलेले रस्ते आणि पूरस्थिती असे चित्र एका बाजूला बघितले तर दुसऱ्या घरटी २५० लिटर पाण्याची मारामार सुरू असल्याचे चित्र होते.

आपणाकडे पाण्याबाबत ज्या म्हणी आहेत त्याची आठवण आजच्या स्थिती प्रकर्षाने होते. सध्या बंगळूरूमध्ये पाण्यासाठी जो आटापिटा होत आहे आणि जलसंधारण प्रयत्न सुरू करण्यात आली आहेत ते म्हणजे 'तहान लागल्यावर विहीर खोदणं' होय.

शहरातील मोठ–मोठे तलाव बुजवून त्यावर टोलेजंग इमारती उभारताना जाणीव होती की यामुळे आपण पर्यावरणाचं नुसतं संतुलन बिघडवत नाही तर पर्यावरण व्यवस्था बाद करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सध्या 'आडात नाही तर पोहऱ्यात कसं येणार' या म्हणीचा पूर्ण प्रत्यय बंगळूरुवासीयांना आला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या महानगरात नोकरी करताना दरमहा लाखेंचा पगार मिळतो हे आकर्षण असलं तरी जगण्याची मूलभूत गरज अर्थात नसेल तर काय याचं उत्तर त्यांना शोधावं लागतंय. चिक्कार पैसा कमावला पण तो 'पाण्यासारखा आणि पाण्यासाठीच' खर्च करावा लागतोय हे बंगळूरूचं वास्तव आहे.

शहराचे नियोजन करताना पुढील साधारण २५ ते ५० वर्षात या भागात काय स्थिती असेल याचा अभ्यास गरजेचा असतो. होणाऱ्या विस्तारासोबत अत्यावश्यक मूलभूत सुविधांचा विकास झाला पाहिजे नव्याने आकारास येणारी शहरे हे पांगळी होतात, बकाल होतात. थोड्याफार फरकाने याच प्रकारे सर्वत्र वाटचाल झाल्याने भारतात पहिला धोक्याचा इशारा बंगळूरुमधून आला आहे.

मानव संस्कृतीचा इतिहास बघितला तर स्पष्टपणे समोर येतं की जंगली आयुष्य असो वा टोळ्यांमधून (टोळी) जगणं त्याही काळी आणि नंतर नागर संस्कृती व शेतीप्रधान समाजाचा विस्ताराचा नद्या आणि पाण्याचे स्रोत हाच राहिलेला आहे. मानव विकासाच्या मूळ उद्देशाकडे दुर्लक्ष करून विकासकांनी केलेल्या नवनगरांमध्ये पाणी ही सर्वात मोठी समस्या आहे.

बंगरूळसारखा धडा समोर आहे जोडीला सर्व विकासाचे नियम पाळणारी देशाची आर्थिक राजधानी मुंबई आहे. मुंबई महानगर आणि लगतची लोकसंख्या २ कोटींवर पोहोचली असली तरी मुंबई किमान पिण्याच्या आणि एकूणच पाण्याच्या वापराबाबत उत्तमरीत्या विकसित झालेले शहर आहे.

आपणास शहरीकरण आणि पर्यावरण यांचे सर्वोत्तम संतुलन 'सिंगापूर'मध्ये पहायला मिळते सिंगापूरचे आर्थिक बाबतीत असलेले जगातले स्थान अव्वल आहे. सहाजिकच या ठिकाणी शहर विस्तार अपरिहार्य असताना निसर्गानं दिलेला पाण्याचा प्रत्येक थेंब योग्यरित्या वापरण्याचं कसब सिंगापूरनं दाखवलय.

सिंगापूरचा संपूर्ण विस्तार पावसाचं साठविण्यासाठी 'बकेट' प्रमाणे होईल असाच राखला आहे. यश मिळणं ही लॉटरी नाही तर त्यामागे नियोजन, जलव्यवस्थापन आहे. हे सिंगापूरचा धडा आपणास शिकवतो.

शेती आणि उद्योग यांच्यासाठी पाणी आवश्यक आहे. पाणी नसणाऱ्या ठिकाणी वस्ती निर्माण करायची व त्यासाठी भूजल साठ्याचा उपसा करायचा असं करीत पैशापायी जमिनीची चाळण करून भूजल साठाही संकटात आला आहे. ही अंदाधुंद वृत्ती चुकीचीच आहे याचं भान आपण ठेवलं पाहिजे.

तो येतोय अशा जागवतोय. तो पाऊस बरसणार हे देखील नक्की पण त्याच्याशी मैत्री करून त्याला आपण साठवलं नाही तर आपण पुन्हा असंच पाण्यासाठी तरसणर हे ही नक्की आता 'पुढच्यास ठेच' लागलीय या म्हणीचा मतीतार्थ जाणून शहाणं व्हावं अन्यथा 'डे झिरो' अटळ आहे.

**–प्रशांत विजया अनंत दैठणकर**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड

# नाशिकमध्ये कांदा, टोमॅटोने केले मतदान; शेतकऱ्यांकडून निर्यात बंदीचा रोष अनोख्या पद्धतीने व्यक्त



नाशिक । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या तर राज्यातील शेवटच्या टप्प्यासाठी मतदान पार पडत आहे. मुंबईतील ६ जागांसह राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये आज मतदान पार पडले. मात्र काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारने केलेल्या कांदा निर्यात बंदीचा रोष नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आज अनोख्या पद्धतीने मतदान करत शासनाचे लक्ष आपल्याकडे वेधण्याचा प्रयत्न केला.

शेतकऱ्यांनी कांदे आणि टोमॅटोचा वापर करत मतदान केले. एवढेच नाहीतर त्यांनी केंद्राच्या आतमध्ये मोबाइल नेते शुटींगही केले. केंद्र सरकारच्या कांदा निर्यात बंदीमुळे नाराज असलेल्या नाशिकच्या चांदवड तालुक्यातील वडगाव–पंगू येथील काही तरुण शेतकऱ्यांनी कांद्याला भाव नसल्याने अनोख्या पद्धतीने निषेध व्यक्त केला.

ऐन कांदा काढणीच्या वेळी केंद्र सरकारने कांदा निर्यात बंदी केल्याने बाजारपेठेतील बाजारभाव कोसळले होते. याचा फटका कांदा उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. त्यामुळे तरुण शेतकऱ्यांनी आज मतदानाला जाताना कांद्याच्या माळा गळ्यात घालून मतदान केंद्रात जाण्याचा प्रयत्न केला.

मात्र पोलिसांनी त्यांना गेटवरच अडवले आणि कांद्याच्या माळा काढण्यास सांगितले. यावेळी शेतकऱ्यांनी पोलिसांसोबत वाद घालण्याचा प्रयत्न केला, मात्र अखेर त्यांनी गळ्यातील माळा काढून मतदान केंद्रात प्रवेश केला.

तसेच काही ठिकाणी शेतकऱ्यांनी ईव्हीएमवर मतदान करताना चक्क टोमॅटोचा वापर केला. एवढेच नाही तर त्यांनी मतदान करताना मोबाइलने शुटींगही केले. टोमॅटोच्या साहाय्याने बटन दाबून मतदान करतानाचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

तसेच शेतकरी कोणाला मतदान करत आहेत, हेही दिसत आहे. सकाळी अपक्ष उमेदवार शांतीगिरी महाराज यांनी ईव्हीएमला हार घालून मतदान केले होते. त्यामुळे तेही चर्चेत आले होते.

# रुग्णवाहिकेचा मार्ग अडवल्यास तुरुंगात जावे लागेल, काय आहे नियम जाणून घ्या



जर तुम्ही रुग्णवाहिकेला रस्ता दिला नाही तर तुमच्याविरुद्ध तक्रार दाखल जाईल, तुम्हाला दंड भरावा लागेल याची तुम्हाला जाणीव असेल. पण तुम्हाला माहीत आहे का की, रुग्णवाहिका किंवा आपत्कालीन वाहनांना मार्ग न दिल्यास कोणालाही तुरुंगात टाकले जाऊ शकते. भारतीय वाहतूक नियमांनुसार, रुग्णवाहिकेसारखी आपत्कालीन वाहने थांबवल्यास तुरुंगवासाची वेळ येऊ शकते. हे कोणत्या परिस्थितीत होऊ शकते ते जाणून घ्या.

**रुग्णाचा मृत्यू झाल्यास भोगावा लागू शकतो**

अनेक वेळा ट्रॅफिकमध्ये अडकल्यामुळे लोक रुग्णवाहिकांना रस्ता देत नाहीत. रुग्णवाहिकेत एखादा रुग्ण उपस्थित असेल, ज्याची प्रकृती गंभीर असेल आणि वेळेवर उपचार न मिळाल्याने त्याचा मृत्यू होऊ शकतो. अशा परिस्थितीत रस्ता न देणाऱ्या व्यक्तीला मोठा दंड भरावा लागू शकतो. इतकंच नाही तर अशा परिस्थितीत रुग्णाचा वाटेतच झाला तर रस्ता न देणाऱ्याला तुरुंगवासही होऊ शकतो.

**आपात्कालीन वाहनांबद्दल कायदा काय म्हणतो ?**

मोटार वाहन कायदा (सुधारणा), २०१९ च्या कलम १९४ए नुसार, जर कोणी अग्निशमन सेवा, रुग्णवाहिका किंवा राज्य सरकारने सूचीबद्ध केलेल्या आपत्कालीन वाहनांच्या मार्गात अडथळा आणला तर त्याला ६ महिने किंवा त्याहून अधिक काळ तुरुंगवास होऊ शकतो. त्या व्यक्तीला दंड किंवा त्याहून अधिक रक्कम भरावी लागू शकते.

**यापूर्वी केवळ ५०० रुपये दंड होता**

२०१९ मध्ये केंद्र सरकारने मोटार वाहन कायद्यात अनेक सुधारणा केल्या. त्यानंतर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दंडाच्या रकमेत वाढ करण्यात आली. यापूर्वी रुग्णवाहिका किंवा आपत्कालीन वाहनाचा मार्ग अडवल्याबद्दल केवळ ५०० रुपयांचे चलन काढले होते.

# मी संघाचा स्वयंसेवक होतो...; निरोप समारंभात निवृत्त न्यायाधीशांची स्पष्टोक्ती



कोलकता । वृत्तसेवा

कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश चित्तरंजन दास सोमवारी सेवानिवृत्त झाले. मी राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचा (आरएसएस) स्वयंसेवक होतो, अशी स्पष्टोक्ती त्यांनी निरोप समारंभात केली. तसेच, त्या संघटनेने पाचारण केले तर पुन्हा कार्य करण्याची तयारीही त्यांनी दर्शवली.

ओडिशात जन्मलेले दास न्यायाधीश म्हणून सुमारे १४ वर्षे कार्यरत होते. ओडिशा उच्च न्यायालयात ऑक्टोबर २००९ मध्ये त्यांना अतिरिक्त न्यायाधीश म्हणून बढती मिळाली. न्यायाधीश म्हणून कलकत्ता उच्च न्यायालयात जून २०२२ मध्ये त्यांची बदली झाली.

सेवानिवृत्त झाल्याने त्यांना न्यायाधीश आणि वकिलांनी विशेष समारंभात निरोप दिला. त्यावेळी दास यांनी संघाशी असणारे नाते नमूद केले. लहानपणापासून युवादशेत असेपर्यंत मी संघाशी जोडला गेलो होतो.

त्या संघटनेचा मी खूप ऋणी आहे. धाडसीपणा, प्रामाणिकपणा मी त्या संघटनेकडून शिकलो. देशभक्ती, कार्याप्रती वचनबद्धता, सर्वांशी समान भाव याबाबीही संघाने माझ्यावर बिंबवल्या.

पान एक वरुन

## अरविंद केजरीवालांच्या अडचणीत

पार्टीला निधी मिळाला आहे.निधी ट्रान्सफर करण्यासाठी लोकांनी एकच पासपोर्ट क्रमांक, क्रेडीट कार्ड, इ-मेल आयडी आणि मोबाइल क्रमांकाचा उपयोग केला असल्याचेही ईडीने म्हटल्याची बातमी आहे.

तसेच परदेशातून निधी जमवताना आपच्या नेत्यांकडून नियमांचे उल्लंघन केल्याच्या अनेक प्रकरणांचाही उल्लेख केला आहे. पक्षाचे नेते दुर्गेश पाठक आणि अन्य नेत्यांवर त्यांनी २०१६ मध्ये कॅनडातून जो निधी जमवला त्याचा व्यक्तीगत लाभासाठी उपयोग केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

आपकडून करण्यात आलेल्या निधी संकलनाबाबत ईडीने दिलेल्या माहितीनुसार पक्षाकडून अमेरिका आणि कॅनडातून केवळ पैसाच गोळा केला गेला नाही तर नियमांपासून बचाव करण्यासाठी आपने खऱ्या दात्यांची ओळखही लपवली. ही बाबही आपच्या अडचणींत वाढ होण्याचे संकेत देते आहे.

## १९ गावात फेरमतदान घेण्याची

बीडमध्ये यंदाच्या निवडणुकीत पंकजा मुंडे विरुद्ध बजरंग सोनवणे यांच्यात थेट लढत झाली. या निवडणुकीत मराठा आरक्षणाचा मुद्दा चांगलाच चर्चेत आला होता. त्यामुळे इथे मराठा विरूद्ध ओबीसी अशी मतांची विभागणी झाल्याचंही म्हटलं जात आहे. त्यामुळे आता बीडकर नेमकं कोणाच्या गळ्यात खासदारकीची माळ घालणार हे ४ जूनलाच कळेल.

## माढ्यात कोण बाजी मारणार

समर्थक आहेत. माढ्यातून मोहिते-पाटील हेच भाजपला रोखतील आणि लोकसभेत निवडून जातील, असा पाटील बंधुंनी आत्मविश्वास बाळगला आहे. त्यातूनच त्यांनी ११ बुलेट गाड्यांची पैज जाहीर केली आहे.

आपले हे आव्हान स्वीकारून म्हणजेच धैर्यशील मोहिते-पाटील हे पराभूत होणार म्हणून कोणी पैज लावेल, ते दोघेही बुलेट गाड्यांच्या शोरूममध्ये जाऊन बुलेट गाड्यांची मागणी नोंदवून त्यांची किंमत भरायची. यात जो विजेता होईल, तो ११ बुलेट गाड्यांचा मालक होणार. ही पैज नोटरीवर रीतहार ठरवली जाईल, असे पाटील बंधुंनी सांगितले. बाजारात एका नवीन बुलेट गाडीची किंमत दोन लाख ७५ हजार रूपये आहे. त्यानुसार ११ बुलेट गाड्यांची एकूण किंमत ३० लाख २५ हजार रूपये एवढी आहे. अकलूजच्या सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक विराजसिंह निंबाळकर यांनी त्याही पुढे जाऊन महागड्या थार मोटारीची पैज जाहीर केली आहे. त्यांचीही पैज स्वीकारण्यासाठी कोणीही पुढे आला नाही.

दुसरीकडे माढ्यात कोण बाजी मारणार, यावर बुलेट गाडीसह चक्क मेंढ्याचीही पैज लावण्यात आली आहे. या पैजांमुळे माढ्याचा निकाल कोणाच्या बाजूने लागणार, याची रंगतदार चर्चा सुरू आहे. चुरशीच्या लोकसभा निवडणुकांमध्ये हारजितीवर पैजा घोषित करून त्या प्रत्यक्षात कृतीत आणणे हा कायदेशीर गुन्हा ठरतो. अशा पैजा लावणे हा जुगाराचा भाग मानला जातो. सांगलीमध्ये पोलिसांनी याबाबत कारवाई केली आहे.

# नैसर्गिक आपत्ती, पुरामुळे जीवित व वित्तीय हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी-विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

यावर्षी मान्सूनचे लवकर आगमन होणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज असून यापूर्वीची काही भागातील अतिवृष्टी व पुरपरिस्थिती लक्षात घेता यावर्षी नैसर्गिक सामना करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवा तसेच नैसर्गिक आपत्ती किंवा पुरामुळे जीवित व वित्तीय हानी होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर विभाग मान्सून पूर्व तयारीबाबत आढावा बैठक विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांच्या अध्यक्षतेखाली आज विभागीय आयुक्त कार्यालयातील सभागृहात पार  यावेळी परभणीचे जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जालना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, बीड जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे, हिंगोली जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, नांदेड जिल्हाधिकारी अभिजित राऊत, लातूर जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे, धाराशिव जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, मनपा आयुक्त, निवासी उपजिल्हाधिकारी तसेच विविध यंत्रणांचे प्रमुख हे संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालय येथून प्रणालीद्वारे उपस्थित होते. तर छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, कर्नल ऋषिकेश सुर्यवंशी, जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता विजय घोगरे, उपायुक्त जगदिश मिनीयार, नयना बोंदार्डे, सुरेश वेदमुथा, लीस पोरे, अतिरिक्त आयुक्त रणजित पाटील यांच्यासह प्रादेशिक विभागप्रमुख बैठकीला उपस्थित होते.



विभागीय आयुक्त श्री. अर्दड म्हणाले की, पावसाळ्यात काही गावांचा संपर्क तुटतो. त्यादृष्टीने निवास व्यवस्था, भोजन व्यवस्था तसेच धान्य, औषधसाठा आदी सामुग्रीबाबत नियोजनपुर्वक व्यवस्था करावी. दूषित पाण्यामुळे साथीचे आजार पसरू नयेत यासाठी जलस्त्रोतांची गुणवत्ता तपासण्याबरोबरच आवश्यक तिथे पर्यायी व्यवस्था करावी. अवकाळी पावसानंतर वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी 'महावितरण'ने तत्परतेने नियोजन करावे. जिल्हा व तालुकास्तरावर असलेला नियंत्रण कक्ष २४ह्न७ नेहमी कार्यान्वित ठेवावा. आपत्ती काळात त्वरित करण्यासाठी विविध आवश्यक विभागांचे आणि संपर्क यंत्रणांचे संपर्क क्रमांक अद्ययावत ठेवावेत, तसेच हे क्रमांक नेहमी सक्रीय असतील याची दक्षता घ्यावी. एसडीआरएफ तसेच एनडीआरएफची बचाव पथके स्थापन करून आवश्यक साहित्यानिशी सुसज्ज ठेवा, असे निर्देश त्यांनी यंत्रणेला दिले.

विजेला अटकाव करणारी यंत्र सुस्थितीत असावी. नादुरुस्त स्थितीत असलेली वीज अटकाव यंत्र तात्काळ करून घेण्यासोबतच जिल्हानिहाय या यंत्रणेत प्रत्येक वर्षी १०० ने वाढ करावी. महानगरात असलेले मोठे नाले, नदी यावर ये-जा करण्यासाठी असलेला लोखंडी मार्ग चांगला आहे किंवा कसे याबाबत तपासणी करावी, आवश्यकता असेल तिथे तातडीने बदल करावा. महानगरातील नाल्यांची सफाई कामे तातडीने पूर्ण करावी. जीर्ण इमारती, पूलांचे सर्वेक्षण करून सुरक्षिततेबाबतही तत्परतेने करावी. महानगरातील ज्या भागात पावसाळ्यात आपत्कालीन परिस्थिती उद्भवते, त्यासाठी तेथील नागरिकांचे स्थलांतर कुठे करावे याबाबत पूर्वतयारी करावी. अशा सूचनाही विभागीय आयुक्त श्री अर्दड यांनी दिल्या.

घाटकोपर, मुंबई येथे जाहिरात फलक कोसळण्याची घटना घडली आहे. मान्सून पूर्व कालावधीत व अन्य कालावधीत होणाऱ्या दुर्घटनामध्ये जीवितहानी टाळण्यासाठी शहरी भागातील व महामार्गावरील लावण्यात जाहिरात फलकांची रचनात्मक तपासणी करण्यात यावी. तपासणीअंती आढळून आलेले अवैध जाहिरात फलकाबाबत संबधितावर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी. आपल्या अधिनस्त क्षेत्रात जाहिरात फलक कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून नैसर्गिक आपत्तीच्या वेळी जाहिरात फलकाच्या आजूबाजूला न थांबण्याबाबत नागरिकांना सूचना देण्याचे निर्देशही त्यांनी यंत्रणेला दिले.

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील संभाव्य तसेच दुर्गम गावे, बचाव पथकांची मोटर बोट, लाईफ जॅकेट, लाईफ रिंग्ज, रोप बंडल, सर्च लाईट, मेगा फोन, ग्लोव्हज, रेनकोट, स्कूबा डायव्हिंग कीट, हेल्मेट आदी विविध साधने, बचाव पथकांची मॉक ड्रिल, संरक्षित निवारा व भोजन व्यवस्था, पिण्याचे पाणी, विज पुरवठा, नियंत्रण कक्ष, विजेचे संकेत देणारे दामिनी प, नदी-नाल्यांची सफाई व आदी बाबीं संदर्भात पूर्वतयारीबाबत जिल्हानिहाय जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त यांनी बैठकीत माहिती दिली.

यावेळी आपत्ती विभागाशी सबंधित विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# ॲट्रोसिटीचा गुन्हा नोंदवण्यासाठी ठोस नियम हवेत-उच्च न्यायालय

**मुंबई । प्रतिनिधी**

ॲट्रोसिटीचा गुन्हा नोंदवण्यासाठी ठोस नियम हवेत. यासंदर्भात नेमके काय करता येईल याचा विचार सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) यांनी आवश्यक वाटल्यास करावा. यासाठी या आदेशाची सह आयुक्त यांना पाठवून द्यावी, असे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

न्या. अजय गडकरी व न्या. शाम चांडक यांच्या खंडपीठाने सरकारी वकील व्ही. ए. पुलकर्णी यांना हे आदेश दिले आहेत. आमच्या समोर असलेल्या याचिकेतील मुद्दे बघता पहिल्यांदा नोंदवण्यात आलेल्या तक्रारीत तक्रारदाराची जात नमूद नव्हती. आरोपीने कोणते जातवाचक वक्तव्ये केले तपशील नव्हता. पुरवणी जबाबात तक्रारदाराने त्याची जात सांगितली. दुसरा पुरवणी जबाब तर दोन महिन्यांनी नोंदवण्यात आला. याचा अर्थ तपासातील गाळलेले मुद्दे भरून काढण्यासाठी हे सर्व करण्यात आले आहे, असे तूर्त तरी स्पष्ट होते. परिणामी आम्ही नोंदवलेले हे मत व याचिकेतील मुद्दे याचा सारासार विचार करता ॲट्रॉसिटीचा गुन्हा नोंदवण्यासाठी काही ठोस उपाययोजना करायला हव्यात. आवश्यक वाटल्यास सह पोलीस आयुक्तांनी उपाययोजना कराव्यात, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

**न्यायालयाचे आदेश**

याप्रकरणाचा पोलिसांनी तपास करावा. पण न्यायालयाच्या परवानगीशिवाय आरोपपत्र दाखल करू नये, असे आदेश न्यायालयाने पोलिसांना दिले. यावरील पुढील सुनावणी ८ जुलै २०२४ रोजी होणार आहे.

**काय आहे प्रकरण**

ताडदेव येथील संदेश केसरकर ही याचिका केली आहे. त्यांची येथील एसआरएच्या इमारतीत तीन घरे आहेत. त्यावर तक्रारदाराचा आक्षेप होता. तक्रारदाराने एसआरएकडे याबाबत तक्रार केली आहे. तो वारंवार केसकर यांना त्रास देत होता. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी केसकर व तक्रारदार यांच्यात वाद झाला. मला त्रास देण्यासाठी येथे येतोस का? माझ्याविरोधातील तक्रारी मागे घे, असे तक्रारदाराला म्हणाले. त्यानंतर त्यांच्यात हाणामारी झाली. तक्रारदाराने केसरकर यांच्याविरोधात ताडदेव पोलीस ठाण्यात मारहाण व ॲट्रोसिटीचा गुन्हा नोंदवला. हा गुन्हा रद्द करण्यासाठी त्यांनी ही याचिका केली आहे.

**पोलिसांनी डोके वापरले नाही- न्यायालयाचा ठपका**

हा गुन्हा नोंदवण्यामागे पोलिसांचा सुप्त हेतू असावा. किंवा एवढे गंभीर कलम लावताना पोलिसांनी डोके वापरले नाही, असे स्पष्ट होते, असा ठपका न्यायालयाने ठेवला.

# राज्यात मान्सूनपूर्व पावसाला सुरूवात

## कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगरसह अनेक ठिकाणी हजेरी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यभरात अनेक ठिकाणी मॉन्सूनपूर्व पावसाने आज हजेरी लावली. कोल्हापूरसह अन्य जिल्ह्यांमध्ये विजांच्या गडगडाटामध्ये वादळी पावसाने तडाखा दिल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये करवीर तालुक्यात आज वादळी पावसाने हजेरी लावली. दुपारच्या सुमारास आलेल्या पावसाने अनेकांची तारांबळ उडाली. यामुळे अनेक ठिकाणी झाडे कोसळल्याच्या घटना घडल्या.

जोतिबा रोडवर हॉटेल साम्राज्य शेजारी एक भलं मोठं झाड चार चाकीवर येऊन कोसळले. या वाहनामध्ये पाच ते सहा भाविक असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. दरम्यान याच रोडवरती जवळपास सात ते आठ झाडे वादळामध्ये पडली. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतुकीवर परिणाम झाला आहे. कसबा बावडा ते वडणगे रस्त्यावर सुद्धा झाडांसह वीजेचे खांब वादळामुळे मोडून पडले आहेत. वडणगे स्मशानभूमीचे छतही उडून गेलं आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कोल्हापुरात पडझडीच्या घटना घडल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगर शहरासह जिल्ह्यात ग्रामीण भागात वादळी वाऱ्यासह विजेच्या कडकडाटासह पावसाने जोरदार तडाखा दिला. करमाड, शेकटा आणि करंजगाव शिवारात विजेच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. बिडकिन शिवारात अवकाळीचा फटका शेतकऱ्यांच्या पपईच्या बागांना बसला असून हे पीक आडवे झाले आहेत. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. उन्हाळी पिकांना देखील याचा मोठा फटाका बसला आहे.

या अवकाळी पावसामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याने लवकरात लवकर पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. ढगाळ वातावरणामुळे उन्हाचा चटका कमी अधिक होत असतानाच उकाडा मात्र कायम आहे. दरम्यान, मराठवाड्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा हवामान विभागाने वर्तवला आहे.

# ..तर दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देऊ-अरविंद केजरीवाल

नवी दिल्ली । वृत्तसेवा

आम आदमी पक्षाला मते दिल्यास आम्ही दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देऊ, असे आश्वासन दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी सोमवारी (दि.२०) जनतेला दिले.

दिल्लीतील कायदा व सुव्यवस्था सुधारली जाणार असल्याचे त्यांनी राजधानी दिल्लीत २५ मे रोजी होऊ घातलेल्या मतदानासाठी जोरात प्रचार



सुरू आहे. केजरीवाल यांनी दक्षिण दिल्लीतील 'आप'चे उमेदवार साहीराम पहलवान यांच्या प्रचारासाठी 'रोड शो' केला. गाडीचे 'सन रूफ' उघडून त्यांनी जनतेला संबोधित केले. केजरीवाल म्हणाले की, केंद्रात इंडिया आघाडीचे सरकार स्थापन होणार असल्यामुळे भाजप आणि पंतप्रधान मोदी गोंधळले या सरकारमध्ये आपचा सहभाग राहणार आहे. आमचे सरकार आल्यास दिल्लीला पूर्ण राज्याचा दर्जा देणार आहोत. दिल्लीची कायदा व सुव्यवस्था सुधारून दिल्लीचे जनतेसाठी काम करणारे उपराज्यपाल आणणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# ईव्हीएम मशीनला हार घालणं शांतीगिरी महाराजांना महागात पडले; गुन्हा दाखल

नाशिक । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात राज्यातील १३ मतदारसंघासाठी मतदान होत आहे. त्यातीलच नाशिक लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे, महाविकास आघाडीचे उमेदवार राजाभाऊ वाजे आणि अपक्ष उमेदवार महाराज यांनी सकाळीच मतदान केले. परंतु, या तिन्ही उमेदवारांमध्ये अपक्ष उमेदवार शांतिगिरी महाराज यांच्यावर सध्या आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती समोर येत आहे.

नाशिकचे अपक्ष उमेदवार शांतीगिरी महाराज यांनी त्र्यंबकेश्वरच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या मतदान केंद्रवर मतदान केले. मतदान केले. मात्र त्यानंतर शांतिगिरी महाराजांनी आपल्या हार ईव्हीएम मशीनला घातला. त्या आधी त्यांनी मतदान केंद्राबाहेर बेलफुलाने पुजा करून वंदन केले होते. हा आदर्श आचारसंहितेचा उल्लंघन असल्याचा आरोप विरोधकांनी केला होता. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या संदर्भातील



घटनेची माहिती मागवली होती.

**शांतीगिरी महाराजांवर गुन्हा दाखल**

त्यानुसार आता शांतीगिरी महाराजांवर आचारसंहितेचे उल्लंघन केल्या प्रकरणी दाखल करण्यात आलाय. त्र्यंबकेश्वर मधील मतदान केंद्रातील मतदान कक्षावर गळ्यातील हार टाकणे शांतीगिरी महाराजांना चांगेलच महागात पडले आहे. दरम्यान, शांतीगिरी महाराजांच्या सहकाऱ्याला मतदान केंद्रावर चिठ्ठ्या वाटताना म्हसरूळ पोलिसांनी ताब्यात घेतले होते. यानंतर अंबडच्या हद्दीत कार्यकर्त्यांच्या कुर्त्यांवर जय बाबाजी असा शब्द लिहिल्याने पोलिसांनी यावर आक्षेप घेतला.

**ईव्हीएममध्ये पण देव**

मतदान केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना शांतीगिरी महाराज यांनी,आम्ही सर्वात देव बघतो, ईव्हीएममध्ये पण देव आहे शांतिगिरी महाराज यांनी सांगितले. त्या आधी त्यांनी मतदान केंद्राबाहेर बेलफुलाने पूजाकरून वंदन केले हा आदर्श आचारसंहिते उल्लंघन असल्याचा आरोप विरोधकांनी केला. मात्र मतदान केंद्र हे पवित्र ठिकाण असून आम्ही शुद्ध भावनेतून केल्याचे शांतीगिरी महाराज यांनी सांगितले.

# इराण राष्ट्राध्यक्षांच्या निधनाबद्दल भारतात एकदिवसीय राष्ट्रीय दुखवटा



नवी दिल्ली । वृत्तसेवा

इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रायसी यांच्या अपघाती निधनाबद्दल भारतात २१ मे रोजी एकदिवसीय राष्ट्रीय दुखवटा पाळण्यात येणार आहे. यादिवशी संपूर्ण देशात राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकवला जाणार असून कुठलेही अधिकृत मनोरंजन कार्यक्रम घेतले जाणार नसल्याचे गृहमंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेत म्हटले आहे.

इराणचे राष्ट्राध्यक्ष इब्राहिम रायसी आणि परराष्ट्रमंत्री अब्दुल्लाहियान यांचे हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले. त्याबद्दल शोकसंवेदना व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दु:खाच्या काळात भारत इराणच्या पाठीशी उभा असल्याचे म्हटले आहे. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनीही आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.

# निवडणूक आयोग भाजपाचा घरगडी; उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल, भाजपाकडून तक्रार दाखल

**मुंबई । प्रतिनिधी**

ज्या ठिकाणी शिवसेना उबाठा पक्षाला जास्त मते मिळत आहेत अशा ठिकाणी जाणिवपूर्वक मतदारांची अडवणूक केली जात आहे. जेणेकरुन मतदार कंटाळून घरी परत जाईल अशी परिस्थिती निर्माण केली जात आहे. मोदी सरकारकडून निवडणूक आयोगाचा वापर घरगड्यासारखा केला जात आहे, निवडणूक आयोगाकडून पक्षपातीपणा केला जातोय, अशी जळजळीत टीका माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलीय.

**मतदारांना जाणिवपूर्वक अडवलं**

लोकसभेच्या मतदानासाठी मुंबईसह परिसरातील मतदार मोठ्या संख्येनं घराबाहेर पडले होते. रांगा लावून मतदान करण्याचा त्यांचा निर्धार होता. मात्र, निवडणूक आयोगाच्या कार्यपध्दतीमुळं हे मतदार घरी परतले. मात्र, सायंकाळी सहा वाजेपर्यंत जे मतदार रांगेत असतील त्या सर्वांचं मतदान करुन घ्यावं लागतं. त्यामुळं मतदारांनी पुन्हा मतदार केंद्रावर जावे आणि मतदानाचा अधिकार बजावावा, असं आवाहन




ठाकरे यांनी केलं होतं. ज्या ठिकाणी मतदारांना जाणिवपूर्वक अडवलं जात आहे. त्याठिकाणी कार्यरत असलेल्या निवडणूक आयोगाच्या बुथवरील अधिकाऱ्यांची नावं लिहून आम्हाला द्यावीत, आम्ही ती जाहीर करु आणि गरज भासल्यास न्यायालयासमोर दाद मागू असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

**भाजपाची ठाकरेंविरोधात तक्रार**

मतदान प्रक्रिया सुरु असतानाच उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन खोटी व दिशाभूल करणारी विधाने केली. एवढेच नाही तर सत्ताधारी भाजपावर बिनबुडाचे आरोप करतानाच त्यांनी निवडणूक आयोगावरही आरोप केले आहेत. हे आचारसंहितेचे उल्लंघन असून, यावर कारवाई करण्यात यावी, अशी तक्रार मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार यांनी निवडणूक आयोगाकडं केली

मोदी सरकारला पराभवाची धास्ती आहे. त्यामुळं त्याच्याविरोधात असलेल्या ठिकाणी कमी मतदान करण्याचा डाव खेळला जात आहे. मात्र, त्यांचा डाव उलटवण्यासाठी मतदारांनी पुन्हा मतदान केंद्रात जावं आणि गरज भासल्यास पहाटेपर्यंत मतदान करावं, असं ठाकरे म्हणाले होते. विरोधात असलेल्या मतदारांनी मतदानाला उतरु नये यासाठी मोदी सरकारचा दिरंगाईचा डाव असल्याचा आरोप ठाकरे यांनी केलाय. आम्हाला जास्त मतदान होण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी जाणिवपूर्वक असे प्रकार केले जात होते. कारण नसताना अधिकारी मतदारांना छळत होते. नावे वगळली जाणे हा त्यांचा आवडता खेळ आहे. मतदानाला गेलेल्यांना जाणिवपूर्वक वेळ लावला जात होता. निवडणूक आयोगाच्या माध्यमातून खेळला जाणारा हा खेळ आहे. शिवसेनेला मतं मिळण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी मतदान कमी होण्यासाठी हा डाव खेळला जात होता. यामध्ये राजकीय कट असल्याची टीका उद्धव ठाकरे यांनी केलीय.

मुंबईत उन्हाचा तडाखा मोठ्या प्रमाणात असल्यानं त्याचा त्रास नागरिकांना झाला. मोठ्या रांगा आणि मतदान पुढे सरकत नसल्यानं मतदारांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपध्दतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली.

# उच्च न्यायालयाचा भाजपला दणका; निवडणूक आयोगालाही फटकारले, जाहिरातींवर घातली बंदी

कोलकाता । वृत्तसेवा

ऐन लोकसभा निवडणूकीत कोलकाता उच्च न्यायालयाने सोमवारी भाजपला मोठा दणका दिला. न्यायालयाने भाजपवर पुढील आदेशांपर्यंत तृणमूल कॉंग्रेसविरोधातील कोणत्याही प्रकारच्या अपमानजनक जाहिराती प्रसिद्ध करण्यास बंदी घातली आहे.

तृणमूल कॉंग्रेसने भाजपच्या जाहिरातींविरोधात कोलकाता उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. याप्रकरणी आज सुनावणी पार पडली. यावेळी न्यायमूर्ती सब्यसाची भट्टाचार्य यांनी निवडणूक आयोगालाही फटकारले. यावेळी उच्च न्यायालयाने निवडणूक आयोग अपमानजनक जाहिराती रोखण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचे ताशेरे ओढले आहेत.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वेगवेगळ्या पक्षांनी मतदारांना आकर्षित करण्यासाठी, लोकांची मतं मिळवण्यासाठी टीव्ही आणि समाजमाध्यमांवर वेगवेगळ्या जाहिराती प्रसिद्ध केल्या आहेत. या जाहिरातींमध्ये अनेक पक्षांनी लोकांसाठी केलेल्या कामांपेक्षा विरोधकांवरील टीका-टिप्पण्यांचा भडीमार अधिक असल्याचे चित्र समाजमाध्यमांवर पाहायला मिळत आहे.

भाजपने विरोधी पक्षांवर टीका करणाऱ्या अनेक जाहिराती प्रसिद्ध केल्या आहेत. यामध्ये टीएमसी आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर निशाणा साधणाऱ्या जाहिरातीदेखील आहेत. भाजपने या जाहिराती प्रसिद्ध केल्यानंतर तृणमूल कॉंग्रेसने निवडणूक आयोगाकडे तक्रार केली होती. मात्र आयोगाने याप्रकरणी कोणत्याही प्रकारची कारवाई केली नाही. त्यामुळे टीएमसीने थेट उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता.

तृणमूलच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायमूर्ती भट्टाचार्य म्हणाले, तृणमूल कॉंग्रेसने केलेल्या तक्रारी निर्धारित वेळेत सोडवण्यात निवडणूक आयोग पूर्णपणे अपयशी ठरला आहे. निवडणूक आयोग टीएमसीच्या तक्रारींचे निवारण निवडणुकीनंतर करणार होता का? निवडणुकीनंतर या सगळ्याला काहीच अर्थ उरत नाही. निर्धारित वेळेत निवडणूक आयोग कुठल्याही प्रकारची कारवाई करण्यात असमर्थ ठरल्यामुळे हे न्यायालय पुढील आदेशांपर्यंत अशा प्रकारच्या जाहिराती प्रसिद्ध करण्यावर बंदी घालत आहे.

न्यायालयाने म्हटले की, सायलेन्स पीरियडदरम्यान (मतदानाच्या एक दिवस आधी आणि मतदानाच्या दिवशी/ आचारसंहिता लागू झाल्यानंतर) भाजपच्या जाहिराती आदर्श आचारसंहिता आणि तृणमूल कॉंग्रेसच्या अधिकारांचे उल्लंघन करत आहेत. देशात निष्पक्ष निवडणुका व्हायला हव्यात, हा नागरिकांचा अधिकार असून या जाहिराती नागरिकांच्या अधिकाराचे उल्लंघन करतात, असे आदेशात नमूद केले.

# बिंदुसरा नदीपात्राशेजारील ३०० घरांना महापुराचा धोका
# मान्सुनपुर्व साफसफाईची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

मान्सून कालावधीत पुर अथवा वादळांमुळे नैसर्गिक आपत्ती येण्याची दाट शक्यता असते या परिस्थितीला तोंड देण्यासाठी जिल्हा प्रशासन आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करून आधिका-यांच्या बैठका घेण्याचा सपाटा लावत संबंधित कार्यालयात २४ तास नियंत्रण सुरू करते मात्र बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रातील फ्लड झोन (पुर नियंत्रण रेषा) मध्ये सुरु असलेल्या अनाधिकृत बांधकाम आणि नदीपात्रातील उगवलेल्या बाभळीमुळे नदीपात्रात अरूंद झाले असुन झाडांना पाणी आडुन शहरात शिरण्याची दाट शक्यता असुन बिंदुसरा नदीपात्राशेजारील ३०० घरांना महापुराचा धोका असुन त्याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे त्यामुळे एकंदरीत आपत्ती व्यवस्थापनाच्या नेहमीप्रमाणेच वांझोट्या ठरणार आहेत.त्यामुळे संबंधित प्रकरणात तातडीने उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे,शेख युनुस,सुदाम तांदळे , शिवशर्मा शेलार , रामनाथ खोड यांनी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, विभागीय आयुक्त यांना केली आहे.

**पाठीशी नगरपरिषद प्रशासन ; नदीपात्रात अनाधिकृत बांधकाम**

बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रातील पुर नियंत्रण क्षेत्रातील भुमाफियांकडुन करण्यात आलेल्या व सुरू असलेल्या अनाधिकृत बांधकामाकडे नगरपरिषद अधिकारी आणि कर्मचारी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असुन बीड शहरातील नदी नाले,ओढे यांच्यावर राजकीय पुढारी, कार्यकर्ते, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड, नगररचनाकार,भुमिअभिलेख, जलसंपदा विभाग कार्यालय यांनी संगनमतानेच भुमाफियांशी लाभातुन हातमिळवणी केली आहे.बीड शहरातील नदी,नाले,ओढे यांचे सर्व्हेक्षण करणे गरजेचे आहे.सव्हेक्षण नसल्याने रेडफ्लर्ड लाईन व ब्लूलाईन हा पट्टा ठरविण्यात आला नसल्याने नगरपरिषद प्रशासन याचा गैरफायदा घेत असुन अतिक्रमित बांधकाम प्रकरणी कंत्राटदार व जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.





## व्यवस्थापनाच्या वांझोट्या बैठका

महापुर येण्यास पुरक्षेत्रातील अतिक्रमणे, अवैध बांधकाम कारणीभूत असुन त्यामुळे पुरबाधित क्षेत्र असलेल्या ब्लु आणि रेड झोनमध्ये बांधकामांना परवानगी देण्यात येऊ नये असे मुख्यमंत्री यांचे स्पष्ट आदेश असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. १९८९ साली अतिवृष्टीमुळे शहरातील अनेक भागात पाणी शिरल्याने मोठ्या प्रमाणात आर्थिक व झाली होती आणि २०१४ आणि २०२१ साली झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरात पुर सदृश स्थिती निर्माण झाली होती. मोठ्या प्रमाणात नागरीकांना याचा फटका बसला होता.शहरातील विविध भागांमध्ये पाणी शिरल्याने शहरवासीयांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले होते. बिंदुसरा नदीपात्रा शेजारील राहणा–या तब्बल ३०० घरांना महापुराचा धोका असुन नगरपालिकेकडुन कोणतीही उपाययोजना करण्यात येत अशा दुर्घटना घडुन वित्तहानी व जिवितहानी झालेली असुन शहरातील मोमीनपुरा, खासबाग,जुना मोंढा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक,पेठ बीड भागातील लोकांची पुर आल्यानंतर तारांबळ उडते. त्यामुळे तातडीने उपाययोजना करण्यात यावी.

### बिंदुसरा नदीपात्राचा डंपिंग ग्राउंड म्हणून वापर नदीपात्रातील जैविक कचरा आरोग्यास घातक

शहरातील आसपासच्या भागातील कचरा,घाण पाणी तसे रूग्णालयातील घातक कचरा उचलुन बिंदुसरा नदीपात्रात टाकला जात असल्याने नदीचे पात्र अरूंद होण्याबरोबरच नागरीकांना दुर्गंधीचा सामना लागत असुन रूग्णालयातील जैविक घातक कच–यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे त्यामुळे संबंधित प्रकरणात दंडात्मक कारवाई करण्यात यावी.

**–डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**

**नदीपात्रातील बाभळबनामुळे पाणी शहरात शिरण्याची शक्यता झाडांची साफसफाई आवश्यक**

बिंदुसरा नदीपात्रात मोठमोठी बाभळीची झाडे उगवली आहेत.त्यामुळे नदीचे पात्र अरूंद व अस्वच्छ आहे.या झाडांना पाणी अडुन पाणी शहरात घुसण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे तातडीने साफसफाई करण्याची आवश्यकता आहे.

# जिल्ह्यात ३१ मे रोजीपर्यंत मनाई आदेश लागू

**बीड । प्रतिनिधी**

दि. २३ मे २०२४ रोजी बौध्द पोर्णिमा साजरी होणार असल्याने व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी जिल्हादंडाधिकारी दिपा मूधोळ- मुंडे यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक १७ मे २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते ३१ मे २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## राधाकृष्ण महाराज यांच्या भजन संध्येचे आयोजन
### माहेश्वरी युवक मंडळाच्या वतीने उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

देश विदेशात आपल्या जादुई आवाजाने श्रीमद् भागवत कथा नानीबाईचा मायरा व भजन संध्या द्वारे अगणित भक्त परंपरा निर्माण करणारे, प्रभात फेरीद्वारे गावागावात भक्ती संप्रदायाचा प्रसार करणारे परमपूज्य आदरणीय राधाकृष्णजी महाराज यांची सुमधुर संध्या मंगळवार दिनांक २१ मे २०२४ रोजी सायंकाळी सात वाजता वृंदावन गार्डन येथे संपन्न होणार आहे.



बंकटस्वामी संस्थान नेकनूर येथे भव्य स्वरूपात महाराजांची भागवत कथा चालू आहे. त्यालाही भक्तांचा प्रचंड प्रतिसाद लाभत आहे. माहेश्वरी युवक मंडळाच्या विनंतीवरून महाराजांनी बीड वासियांसाठी वेळ देण्याची तयारी दाखवली असून मंगळवारी सायंकाळी सात वाजता संध्येचेआयोजन करण्यात आलेले आहे. आपले संपूर्ण आयुष्य गोमातेच्या सेवेत व्यतीत करणाऱ्या राधाकृष्ण महाराजांचा मोठा भक्तिपरिवार असून विविध टीव्ही चॅनल्सवर नेहमी त्यांचे भक्तिमय कार्यक्रम चालू असतात. माहेश्वरी युवक मंडळांनी या भजन संध्येची जय्यत तयारी केली असून महाप्रसादाचेही आयोजन भजन संध्या च्या पश्चात करण्यात आहे.

## कर्जाला कंटाळून दोघांच्या आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

कर्जबाजारीपणाला कंटाळून दोन जणांनी आत्महत्या केल्याची घटना जिल्ह्यात मागील २४ तासांत घडली. गेवराई तालुक्यातील बागपिंपळगाव आणि धारूर तालुक्यातील चारदरी ही घटना घडली. पंडितराव अमृतराव मुगुटवार (वय ६२, रा. बागपिंपळगाव) यांच्याकडे मंत्री बँकेचे कर्ज होते. कर्जवसुलीसाठी बँकेने त्यांना नोटीस बजावली होती. मात्र, त्यांना कर्ज परतफेड करणे शक्य नव्हते. यामुळे त्यांनी बागपिंपळगाव शिवारातील स्वतःच्या शेतातील विहिरीत उडी घेत आत्महत्या केली. याप्रकरणी किशोर मुगुटवार याच्या माहितीवरून गेवराई पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची करण्यात आली आहे. दुसरी घटना धारूर तालुक्यातील चारदरी येथे घडली. राजाभाऊ मुंडे (वय ६५) यांनी नापिकी आणि सोसायटीच्या कर्जाला कंटाळून विष प्राशन करून आत्महत्या केली. याप्रकरणी धारूर पोलिसांत नोंद करण्यात आली आहे.

## संत बंकटस्वामी महाराज यांनी काकडा भजनाची विशेष उपासना पद्धती वारकरी सांप्रदायाला दिली– गोवत्सल राधाकृष्ण महाराज जोधपूरकर

**बीड । प्रतिनिधी**

संत बंकटस्वामी महाराज यांनी काकडा भजनाची विशेष उपासना पद्धती वारकरी सांप्रदायाला दिली. असे प्रतिपादन राष्ट्रिय भागवत कथा प्रवक्ते गोवत्सल राधाकृष्ण महाराज जोधपूरकर यांनी केली.. श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८० व्यां पुण्यतिथी उत्सवात श्रीमद् भागवत कथेत ते बोलतं होते.. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प किसन महाराज पवार, उध्दव बापू आपेगावकर यांच्या हजारो भावीक भक्तांची उपस्थिती होती.. पहिल्याच दिवशी कथा मंडप भाविकांनी हाऊसफुल्ल झाला. यावेळी विठ्ठला कधी येशील माझ्या घराला.. यां गीतावर कथा मंडपात भाविकांनी मंत्रमुग्ध झाले होते.

श्री क्षेत्र संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात जागतिक खात्याचे भागवत कथाकार गोवत्सल राधाकृष्ण महाराज यांच्या सुमधुरवाणी मधून भागवत कथेला सुरुवात झाली.. पहिल्याच दिवशी भागवत महात्म्य व नाम महात्म्य संगती महिमा, यावरती महाराजांनी सुंदर शब्दात विवेचन केले.. यावेळी बोलताना महाराज म्हणाले की बंकटस्वामी महाराज यांनी वारकरी सांप्रदायात सेवा आणि काकडा हि विषेश उपासना पद्धती मधून देवाशी जोडता येत त्याची सोपी साधना सांगितली..स्वामी च्या दरबारात जेवढी सुंदर कथा होईल तेवढा विठ्ठल प्रसन्न होईल. असा विश्वास व्यक्त केला..

संतावर प्रेम करतो तो देवाला मला आवडतो.देवाशी जोडण्याचां उत्तम काळ प्रातकाळ आहे.संत बंकट स्वामीच्या उपासनेची ऊर्जा अजही इथे पाहायला मिळते.. कथा ही ताप हरणारी पाप मुक्त करणारी देवाची प्राप्ती करून देणारी आहे.. कथेच्या सागरात प्रत्येकाने पवित्र स्नान करण्यासाठी यावे. असे महाराजांनी सांगितले. श्री कृष्णाची कथा जीवनाचा उध्दार करणारी आहे..

## भाटेवाडीत दोन गटात तुंबळ हाणामाऱ्या

पाटोदा । प्रतिनिधी

बांधकामाची माती खोदण्याच्या कारणावरून दोन गट समोरासमोर आले, दोन्ही गटातील लोकांनी लाठ्या काठ्याने हल्ला केला, यात दोन्ही गटातील अनेक जण जखमी झाले. ही घटना पाटोदा तालुक्यातील भाटेवाडी येथे घडली. या प्रकरणी परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सविस्तर माहिती अशी कि, सुनील मंडलिक व कुंडलिक मंडलिक यांच्यामध्ये बांधकामाची माती खोदण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला. या वादातून दोन गट समोरासमोर आले. गटातील लोकांनी एकमेकांवर लाठ्या-काठ्याने हल्ला चढवत मारहाण केली. यात दोन्ही गटातील लोक जखमी झाले आहेत.

या प्रकरणी कुंडलिक दादाराव मंडलिक यांच्या फिर्यादीवरून सुनील मंडलिक, स्वप्नील मंडलिक, गंगाराम मंडलिक, नंदाबाई मंडलिक, बारकाबाई मंडलिक यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले तर विलास मंडलिक यांच्या फिर्यादीवरूएन कुंडलिक मंडलिक, दादाराव मंडलिक, मनिषा मंडलिक, मंडलिक या चौघांविरोधात पाटोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तुरीच्या बियाण्यातून फसवणूक कोर्टाने दिले भरपाईचे आदेश

बीड । प्रतिनिधी

बियाणे खरेदी करताना अनेकदा शेतकऱ्यांची फसवणूक होते. पण फसवणूक झाल्यास लढायचं कसं ? याचे उत्तम उदाहरण बीडच्या गेवराईतील एका शेतकऱ्याने दिले आहे. तीन-चार वर्षांपूर्वी एका तुरीच्या कंपनीचे बी शेतकऱ्यांनी पेरलं. मात्र ते बियाणे वांज निघालं. यामध्ये शेतकऱ्यांना चांगलाच भुर्दंड बसला. याच्या विरोधात गेवराई येथील एका शेतकऱ्याने लढायचं ठरवलं आणि आता त्यांन ही लढाई देखील जिंकली आहे.

बीड जिल्ह्यातील गेवराईतील शेतकऱ्यांनी ३ वर्षांपूर्वी तुरीची लागवड केली. तूर उगवली मात्र वांज निघाली. याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी करायला सुरुवात केली. मात्र त्यांना कुठेही काही भरपाई मिळेल असं दिसलं नाही. अनेक शेतकरी खचून गेले. मात्र एका



शेतकऱ्याने आपल्याला नुकसान भरपाई मिळावी; यासाठी प्रयत्न सुरू केले. सुनील टकले असं या शेतकऱ्याचं नाव आहे.

**८० हजाराची मिळणार भरपाई**

सुनीलने या तुरीच्या पिकाचे नुकसान त्यावेळी त्याने प्रशासनाच्या अधिकाऱ्यांकडे हेलपाटे मारले. मात्र न्याय मिळाला नाही. त्यानंतर त्याने कंझुमर कोर्टामध्ये तक्रार दाखल केली. तीन वर्षानंतर या शेतकऱ्याला आता न्याय मिळाला आहे. झालेल्या नुकसानीच्या पैशासह इतर खर्चासह याला कंपनीने मदत करण्याची ऑर्डर कोर्टाने दिली. त्यामुळे शेतकऱ्याला दिलासा मिळाला आहे. एक एकर प्रति नुकसाना प्रमाणे ७० रुपये व मानसिक त्रासा पोटी ५ हजार रुपये आणि त्याचा झालेला खर्च ५ हजार असे एकूण ८० हजार रुपये देण्याचं कोर्टाने नमूद केले आहे.

## गोदावरी नदी पात्रात अनोळखी पुरुषाचे प्रेत आढळले

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील गोदावरी नदी पात्रात अनोखळी पुरुषाचे प्रेत पाण्यात तरंगत असल्याचे तेथील मच्छीमाराला दिसून आले त्यांनी तलवाडा पोलीसांना या घटनेची माहिती दिली

असता सपोनि सोमनाथ नरके यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक स्वप्निल कोळी उपनिरीक्षक बाळासाहेब भवर, उपनिरीक्षक नेवरे,पोलीस हवालदार जावळे, चालक, घटनास्थळी दाखल झाल्यानंतर पोलिसांनी गोदावरी नदीच्या पात्रातून प्रेत काढण्याची प्रक्रिया सुरु केली. नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. दरम्यान आढळलेल्या प्रेताची दुपारी उशिरापर्यंत ओळख पटलेली नव्हती. सदरील इसमाची ओळख पटविण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## सुख शब्दाला सुखी करण्याचं काम ज्ञानेश्वर महाराज यांनी केले–राधाकृष्णजी महाराज

**बीड । प्रतिनिधी**

सुख या शब्दाला संत ज्ञानेश्वर महाराजांनी सुखी करण्याचं काम केलं.. पांडुरंगाचे रूप पाहिल्यानंतर माणसाच्या जीवनात खरे सुख प्राप्त होते. असे प्रतिपादन राधाकृष्ण महाराज यांनी केले. श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज पुण्यतिथी उत्सवात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प गुंफताना ते बोलत होते.

यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प शांतीब्रम्ह महादेव महाराज. श्री ह भ प मृदंग महामेरू राम महाराज काजळे, श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे.सहदेव महाराज शास्त्री,नवनाथ महाराज जरुडकर ,ज्ञानेश्वर महाराज बावी,मारुती महाराज चोरमले,रामेश्वर महाराज हांगेवाडीकर, विष्णुपंत महाराज नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव यांच्या सह हजारो भावीक भक्तांची उपस्थिती होती.

यावेळी महाराजांनी विठ्ठल माझा माझा मी विठ्ठलाचा हे भजन गायल्यानंतर कीर्तन मंडपात प्रत्यक्ष पंढरपूर निर्माण झाले .



श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज पुण्यतिथी उत्सव मोठ्या थाटात सुरू आहे.यात तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुच्छ गोवत्सल राधाकृष्णजी महाराज यांनी यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या

रूप पाहता लोचनी ! सुख झाले हो साजणी!! तो हा विठ्ठल बरवा !तो हा माधव बरवा!! बहुत सुकृताची जोडी! म्हणून विठ्ठली आवडी!! सर्व सुखाचे आगर! बाप रखुमादेवीवर!!

या रूपाच्या अभंगावर सुंदर असे चिंतन मांडले. पांडुरंगाचे रूप पाहिल्यानंतर माणसाच्या जीवना मध्ये सुख प्राप्त होते. देव दर्शन देत नाही. तसेच चर्मचक्षने देव दिसतही नाही. देवाला पाहायचे असेल तर भावयुक्त अंतकरणाने तळमळ आणि आतुरता असावी. आतुरता जिज्ञासा आणि देव मिळण्याची उत्कंठा असेल तर शक्य होत. माऊली यां अभंगातून रुप कसे पाहायचे याचे मार्गदर्शन करतात. देवाकडे जाताना एक अट आहे. त्यालाच देवाचे दर्शन होते जो फक्त देवालाच पाहण्याची लालसा ठेवतो.सुख शब्दला सुखी करण्याचं काम संत ज्ञानेश्वर महाराज यांनी केले. अनेक जन्माचे पुण्य पदरात असेल तर च देवाची भेट होते.. बहुत सुकृताची जोडी म्हणूनही विठ्ठल आवडी. ज्या संताच्या हृदयात देव आहे त्यांची सेवा केली तर देवाला प्राप्त होते. यावेळी उत्तर येतील संत कुंभांना यांची कथा सांगून. त्यांचा बाप रखमादेवीवर त्यांच्या जीवनात कशाची कमी असेल असे महाराजांनी सोदाहरण पटवून दीले. देवाचे स्मरण केल्याबरोबर देव दुःखातून मुक्ती करून सुखी करतो. त्यामुळे सर्व सुखाचे आगर असलेला पांडुरंग हा विटेवरी उभा आहे असेही महाराजांनी सांगितलं.

यावेळी कीर्तनासाठी साथ संगत महाराष्ट्रातील नामवंत गायक वादक मंडळी व बंकट स्वामी महाराज फडावरील सर्व वारकरी , वारकरी, टाळकरी यांची उपस्थिती होती.

## आज श्री क्षेत्र नेकनुर येथे विदर्भ रत्न संजय महाराज पाचपोर यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**



वारकरी संप्रदायाचे भक्तिसूर्य श्री गुरु बंकट स्वामी महाराज यांच्या ८० व्या पुण्यतिथी उत्सवात आज दि २१ वार मंगळवार रोजी रात्री ९ ११ यां वेळेत तिसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्प श्री ह भ प विदर्भरत्न रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांचे होणार आहे.तरी या कीर्तनाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बंकट स्वामी महाराज संस्थान चे महंत लक्ष्मण महाराज मेंगडे व उत्सव कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे..

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी कल्पना अक्षर मुद्रणालय पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक– विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

“Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Kalpana Akshar Mudranalaya Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas Dolse,(Beed Justice)

# संचार

**जाहिर प्रगटन, कोर्टाची जाहिर नोटीस, जन्म-मृत्युची नोंद, निविदा सुचना, ई टेंडर, नावात बदल, वाढदिवस शुभेच्छा जाहिरात तसेच इतर जाहिराती व बातम्या प्रसिध्दीसाठी संपर्क करा**

**९४२३४७१८३३**

**७०२०६४२६९३**




**दै. संचार च्या अंकाची पीडीएफ आपल्या मोबाईलवर मिळविण्यासाठी ९४२३४७१८३३ या मोबाईल नंबरवर मेसेज करा किंवा क्यूआर कोड स्कॅन करा**